<u>वादीतर्फे विधीज्ञ श्री.आर.आर.विहिरे यांच्यावतीने शपथेवर सुरु.</u>

**३.** आता मला नि.क्र.९६/१ हा दाखला दाखविला. तो भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ कलम ६५-ब अन्वये नामदेव माधवराव आकनगिरे यांच्या खात्याचा उतारा आहे. त्यावर माझी सही आहे. आमच्या बॅकेचा शिक्का आहे. त्यास **<u>नि.क्र.९७</u>** देण्यात येते. आता मला नि.क्र.९६/२ हा दाखला दाखविला. तो भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ कलम ६५-ब अन्वये धनजंय नामदेव आकनगिरे यांच्या खात्याचा उतारा आहे. त्यावर माझी सही आहे. आमच्या बॅकेचा शिक्का आहे. त्यास **<u>नि.क्र.९८</u>** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**

<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.उप्पे यांच्यावतीने सुरु.</u>

**४.** हे खरे की, मी दाखल केलेले कागदपत्र मुळ दस्तावेज नाहीत. हे खरे की, बॅकेतील संगणकाच्या नोंदीवरुन मी साक्ष दिली. सदर नोंदी होताना मी या शाखेत कार्यरत नव्हतो, हे खरे आहे. हे खरे की, ग्राहक

त्याच्या बॅकेतील रक्कम कशासाठी वापरतो याचा बॅकेशी संबंध नाही. नामदेवच्या खात्यावर रक्कम कशा संदर्भाने आली हे मला माहिती नाही. हे खरे की, ठेव ठेवणे व मोडणे हा ग्राहकाचा हक्क आहे. हे खरे की, मी सिस्टीम ॲडमिनीस्टर नाही व मी आय.टी. ॲडमिनीस्टर ही नाही. ट्रान्सफर व्हाउचरवर नामदेव आकनगिरे याची सही असल्याचे मी पाहिलेले आहे. पासींग ऑफीसर याच्या सहीशिवाय कुठलेही व्हाउचर पास होत नाही. त्यामुळे, ती सही आहे असे पासींग ऑफीसरने पाहिल्यानंतरच रक्कम वर्ग झालेली आहे. हे खरे की, रोज रुपये दोन लाख बॅकेच्या खात्यातून काढणे किंवा भरणे नियमबाहय नाही. नामदेव आणि धनजंय यांच्या खात्याच्या संदर्भाने मी साक्ष देत आहे. हे खरे की, व्यक्तीच्या खात्यातील रक्कम त्याची स्वत:ची आहे की एकत्र कुंटूंबाची आहे हे आम्हाला सांगता येणार नाही. हे खरे की, बॅकेच्या संगणक प्रणालीतून मी खात्यांचे उतारे मिळवले आहेत. हे खरे की, या संपुर्ण खात्यांच्या नोंदीचे नियत्रंण आय.टी.डीपार्टमेंटकडे असते. हे खरे की, नि.क्र.९७ व ९८ या दाखल्यात मेक ॲण्ड मॉडेल, सीरीयल नंबर, सर्व्हर आय.डी., मॅक आय.डी नमूद नाही. हे खरे की, कोणत्या विशिष्ट संगणकातून हा डाटा मिळवला याचा उल्लेख त्यात नमूद नाही. सर्टीफीकेटमध्ये आय.एम.ई.आय नंबर १ व २ हे रिकामे आहेत, हे खरे आहे. हे खरे की, दाखल्यात मी हॅश व्हल्यु दिलेली नाही. हे खरे की, त्यासाठी अलगोरीदम नमूद केलेला नाही. सदरचा उतारा हा अधिकृत बॅकर्स बुक एव्हीडंन्स ॲक्टप्रमाणे आहे. हे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**
समक्ष
स्वाक्षरीत/-

**( एस.एन.सरडे )**

दिनांक १६/०२/२०२६.　　दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहमदपूर.